म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. 9233



कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401233
BVBK-0401233

# गुलाम बंड करतो!

# गुलाम बंड करतो

श्रीपाद केळकर

कांहीं तरी नवेंच करा : २

१२33 दि. २०/५/६७
बा. वा.

BVBK-0401233

पन्नास नये पैसे

वोरा अॅन्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.

## स्पार्टकस : बंडखोर गुलामांचा महान् नेता

इसवी सनापूर्वी सत्तर ते चौऱ्याहत्तर अशीं सतत चार वर्षें रोमन साम्राज्यसत्तेविरुद्ध इटलीतील गुलामांनीं पहिलें संघटित बंड उभारलें. या महान् विद्रोहाचा नेता गुलाम स्पार्टकस याची ही कथा आहे.

तात्कालिक यशाचा विचार करतां स्पार्टकसचें बंड अयशस्वी झालें. परंतु आपल्या मुक्तीसाठीं मानवी इतिहासाच्या प्रारंभापासून शोषित व पीडित जनांनीं चालविलेल्या अविरत संघर्षाला स्पार्टकसनें अधिक गति व तेज दिलें.

अन्याय व जुलूम, मग तो कोणाकडून आणि कोठेंहि होवो, त्याविरुद्ध प्रतिकार मांडणाऱ्यांची एक दीर्घ परंपरा मानवी इतिहासांत दिसून येते. या परंपरेंतील कांहीं यशस्वी झाले आणि बहुतेक अयशस्वी झाले. तथापि मानवी इतिहासांत जें जें उदात्त आणि भव्य घडलें त्याचा स्मरणीय वारसा त्यांनीं मागें ठेवला. स्पार्टकस हा त्यांपैकीच एक पुरुष होय.

रोमन साम्राज्याच्या इतिहासांत स्पार्टकस व त्याचें बंड यांचा ओझरता उल्लेख आहे. प्रस्तुत कथा लिहितांना प्रसिद्ध अमेरिकन मानवतावादी लेखक हावर्ड फास्ट यांनीं स्पार्टकस-वर लिहिलेल्या प्रदीर्घ कादंबरीचा उपयोग केला आहे हें कृतज्ञतेनें नमूद केलें पाहिजे.

—श्रीपाद केळकर

श्री : १३५

Copyright
वोरा ॲन्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲन्ड कंपनी
पब्लिशर्स, प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

आवृत्ति दुसरी : १९६१

मूल्य ५० नये पैसे

मुद्रक :
अनंत जे. शाह,
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९.

# गुलाम बंड करतो

### कापुआच्या आखाड्यांत

•

सुमारें दोन हजार सत्तर वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे.

बलाढ्य रोमन साम्राज्याच्या उत्कर्षाचा तो काळ होता. सत्तोन्मत्त रोमन आपल्या समर्थ सेनेच्या बळावर चारी दिशांकडील लहानमोठ्या देशांना गुलाम बनवून साम्राज्यविस्तारांत आणि सत्तेच्या नशेंत दंग होते.

आणि हें सर्व कांहीं रोमन लोकसत्ताकाच्या रक्षणासाठीं आणि संवर्धनाकरितां आपण करीत आहोंत अशी त्यांची भावना होती. रोमन साम्राज्याच्या अस्तित्वांत अलम दुनियेचें, सुसंस्कृत व सभ्य जगताचें भवितव्य सामावलेलें आहे अशी रोमच्या सत्ताधाऱ्यांची प्रामाणिक आणि अहंतापूर्ण समजूत होती.

रोमच्या रिपब्लिकमध्यें—प्रजासत्ताकांत कोणा लोकांची मिजास आणि चंगळ असेल तर ती रोममधील मूठभर सत्ताधाऱ्यांची, लष्करी सेनानींची, सरदारांची आणि जहा-गीरदारांची. विजयानें आणि त्यांतून प्राप्त झालेल्या वैभवानें ते सुस्त आणि शौकीन झाले होते.

लहान लहान गरीब शेतकरी आणि युद्धांत पकडून आण-लेले किंवा बाजारांत विकत घेतलेले गुलाम ही रोमन प्रजा-

सत्ताकाची क्रूर आणि हिडीस पैदास होती. गुलाम तर रोमन लोकांच्या करमणुकीचें खेळणें होतें.

दक्षिण इटलींतील कापुआ या शहरांतील आखाडयांत रोमनांच्या करमणुकीसाठीं त्या दिवशीं सकाळीं गुलामांची झोंबी ठेवण्यांत आली होती. थ्रेसिली देशांतून पकडून आणलेले दोन थ्रेसियन, एक यहूदी व एक आफ्रिकी हबशी अशा चार जवान व तगडया गुलामांना या झोंबीसाठीं, या लढतीकरितां आखाडयाच्या मालकानें—बाटियाटसनें निवडलें होतें.

आजच्या काळांतहि माणसा-माणसांच्या अशा झुंजी किंवा कुस्त्या होतात. तथापि त्या आपखुषीच्या असतात. ही लढत तशी नव्हती. कारण एक तर ती गुलामांची होती. आणि दुसरें असें कीं या लढतींत लढणाऱ्या कोणी तरी एकानें दुसऱ्याला जिवें मारून त्याचें रक्त जमिनीला पाजलें पाहिजे असा हुकूम होता. रोमहून आलेल्या दोन खुशालचेंडू रोमन सरदार-पुत्रांच्या करमणुकीसाठीं पैसे घेऊन आखाडयाच्या मालकानें ती झोंबी ठेविली होती. दोघां गुलामांना आपल्याच दोघां बांधवांच्या नरडीचा घोट घेण्यास फर्माविण्यांत आलें होतें. आणि हें कशासाठीं ? तर त्या दोन रोमन शौकिन तरुणांच्या जिवाच्या चैनीसाठीं !

त्या काळांत दक्षिण इटलींत आणि विशेषतः कापुआ शहरांत गुलामांच्या अशा झोंबी लावणें हा श्रीमंतांच्या करमणुकीचा एक क्रूर खेळ होता. कोणी गुलामानें या झोंबींत भाग घेण्यास नकार दिला तर त्याला कोरडयानें

मारलें जाई किंवा तापवून लालबुंद केलेल्या लोखंडी सळीनें भोंसकलें जाई.

कापुआसारखे आखाडे इटलींत सर्वत्र असत. पिळवणूक आणि दहशत यांवर आधारलेल्या रोमन साम्राज्यांतील समाजाचें तें एक अविभाज्य अंग होतें. युद्धांत पकडून आणलेल्या शूर गुलामांना आणि डाकू, दरोडेखोर गुन्हेगारांना शिक्षा म्हणून या आखाड्यांत डांबून ठेविलें जात असे. आणि प्राणहारक झुंजीचें म्हणजेच मरण्याचें आणि मारण्याचें पद्धतशीर शिक्षण तेथें दिलें जात असे.

कापुआ हें अशा आखाड्यांचें मुख्य केंद्र होतें. त्या दिवशीं तेथेंच त्यांतील चार गुलामांच्या दोन लढती होणार होत्या. अशा लढती हा रोमन जीवनांतील नित्याचा खेळ होता. परंतु त्या दिवशींच्या कापुआच्या या झोंबीनें भावी इतिहास घडविला.

## केवळ करमणुकीसाठीं

•

झोंबीसाठीं तयार केलेल्या चार गुलामांची सकाळीं उठल्यापासून उत्तम तैनात ठेवण्यांत आली होती. त्यांना आंघोळीसाठीं गरम पाणी देण्यांत आलें. सुगंधी तेलानें मालिश करून त्यांच्या शरिरांतील नसन्नस मोकळी करण्यांत आली. त्यांना मांसाचें भोजन देण्यांत आलें आणि मद्य पाजण्यांत आलें.

मद्य-मांसांच्या मस्तींत ते चार गुलाम आतां आपल्याच बांधवांकडून मरण्यासाठीं किंवा त्यांना मारण्यासाठीं तयार

झाले. तो हबशी. आफ्रिकेंतून पकडून आणलेला तो हबशी गुलाम. जन्मतःच तो कांहीं गुलाम नव्हता. आई-बाप आणि बायको-पोरें असलेला पूर्वी तो एक सद्‌गृहस्थ होता. तो हिरव्या डोळ्यांचा, पातळ अंगकाठीचा पण मजबूत शरिराचा यहूदी. तो एका शूर आणि बंडखोर गुलामाचा पोरगा होता. आखाड्याकडे जातांना तो विचारमग्न दिसत होता. आपल्या बापानें गुलामीविरुद्ध बंड करून मानाचें मरण मिळविलें आणि आपणांस मात्र रोमन खुशालचेंडूंच्या चैनीसाठीं फुकाचें मरण पत्करावें लागणार आहे या विचारानें तो दुःखमग्न तर झाला नव्हता ? कोण जाणें ? पण त्याला माहीत होतें कीं अतिविचार हा गुलामाचा शत्रु आहे. आणि तो तिसरा गुलाम थ्रेसियन जवान. आणि तो चौथा— तोसुद्धां थ्रेसियन गुलाम होता. त्याचें नांव स्पार्टकस. त्याचा ढंग मात्र कांहीं आगळाच होता. जाडजाड ओठ, तुटलेलें नाक आणि मेंढ्यासारखा चेहरा असलेला तो गुलाम. पण मान ताठ करून मंदगतीनें तो चालला होता. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें समाधान आणि शांत भाव दिसत होता.

स्पार्टकस-कापुआच्या आखाड्यांतील दोनशें गुलामांचा तो नेता होता. त्याच्या अंगच्या गुणांनीं स्वाभाविकपणें त्याच्याकडे नेतृत्व चालत आलें होतें. साऱ्या गुलामांवर त्याची माया होती. गुलाम त्याला 'बाबा' म्हणून हांक मारीत. तो कोणाशीं चढ्या आवाजांत बोलत नसे कीं कोणावर रागावत, ओरडत नसे. विचित्र उच्चार असलेल्या

आपल्या लॅटिन भाषेंत आपल्या हलक्या आवाजांत तो बोले त्यावेळीं गुलामांना त्यापासून विलक्षण सांत्वन मिळे.

आखाड्याच्या मालकाला-बाटियाटसला कळून चुकलें कीं स्पार्टकसपासून धोका आहे. स्पार्टकस मानी होता. गुलामांनींहि तसें व्हावें असें त्याला वाटे. म्हणून बाटियाटसला स्पार्टकसचा काटा काढावयाचा होता. त्या दिवशींच्या झोंबींत हा डाव त्याला साधावयाचा होता. म्हणून बाटियाटसनें स्पार्टकसच्या हातीं लढतीसाठीं फक्त एक सुरी दिली आणि त्याच्या जोडीदाराच्या हातीं तीक्ष्ण त्रिशूळ आणि जाळें दिलें. तो सामना विजोड होता. स्पार्टकस त्यांत मरणार अशी बाटियाटसची खात्री होती. दुसरी जोडी यहूदी व तरणाबांड थ्रेसियन यांची होती.

लढतीची वेळ झाली. त्या चौघांना मैदानाकडे हवालदार आणि उस्ताद यांच्या पहाऱ्यांत नेण्यांत येत होतें. त्या चौघांनीं एकमेकांशीं किंवा त्यांच्याशीं इतर गुलामांनीं बोलतां कामा नये अशी सक्त ताकीद देण्यांत आली होती. पण गुलामांच्या नेत्याला–स्पार्टकसला मारण्यासाठीं मैदानाकडे नेण्यांत येत होतें. गुलामांचीं मनें तडफडत होतीं. त्यांचा राग अनावर झाला होता. दुःख बोलून दाखवितां येत नव्हतें. पण एका गुलामाला राहवलें नाहीं. तो धांवत धांवत स्पार्टकसजवळ आला आणि त्यानें त्याला दुःखातिशयानें आलिंगन दिलें. भयंकर अपराध होता तो ! त्या गुलामाला त्याबद्दल किंमत द्यावी लागली. काड्, काड् ! तीस फटके त्याला मिळाले !

या घटनेनें तर आखाड्यांतील गुलाम संतापानें जळूं लागले. गुलामांच्या सहनशीलतेलाहि मर्यादा असतात हें दाखविण्याच्या संधीची वाट पहात त्यांनीं त्या तीस फटके बसणाऱ्या आपल्या बांधवाचा आक्रोश कान आणि हृदय कठोर करून ऐकला.

आखाड्याच्या प्रवेशद्वारापाशीं उभा राहून बाटियाटस त्या जवान शौकिन रईसजाद्यांची वाट पहात होता. शेवटीं ते दोघे आले. त्यांच्याबरोबर त्यांचे आणखी दोनतीन दोस्त होते. त्यांत एक विवाहित तरुणीहि होती. मोठ्या इतमामानें त्यांच्यासाठीं खास मांडलेल्या आरामशीर कोचांवर बाटियाटसनें त्यांना बसविलें. पाहुण्यांना उन्हाचा त्रास होऊं नये म्हणून त्यांच्या डोक्यावर छत्री धरून गुलामांना उभें करण्यांत आलें. उकाडा होऊं नये म्हणून मोरपिसांच्या पंख्यानें वारा घालण्यासाठीं आणखी दोन-चार गुलामांना राबविण्यांत येत होतें. लढतीस प्रारंभ व्हावयास अजून थोडा वेळ होता. करमणुकीसाठीं दोन गवय्ये आणि एक नृत्यांगना यांचा गायन-नृत्याचा मंजुळ कार्यक्रम सुरूं झाला. हास्यविनोद आणि थट्टामस्करी करून पाहुणे जिवाची करमणूक करण्यांत आणि गप्पा मारण्यांत चूर होते. त्यांच्या गप्पांचा काय विषय असेल बरें ? रोममध्यें ऐषारामांत रहावयाचें असेल तर काय करावें आणि त्यासाठीं कशाची जरुरी असते हा गप्पांचा मुख्य विषय होता. हरेक कामासाठीं दिमतीस एकेक गुलाम ठेवल्याशिवाय खरा आराम मिळत नाहीं याबाबतींत त्यांचें एकमत झालें. हजामत करण्या-साठीं एक, मालिश करण्यासाठीं दुसरा, स्नान घालण्यासाठीं

तिसरा, कपडे धुण्यासाठीं चौथा, अंगावरून कपडे उतरवून घेऊन ते नीट कपाटांत ठेवण्यासाठीं पांचवा, शयनागारासाठीं सहावा, स्वयंपाक करून घालण्यासाठीं सातवा–असे एक ना दोन, अनेक गुलाम तैनातीसाठीं असले तरच आराम मिळतो हा त्यांच्या गप्पांचा निष्कर्ष होता.

परंतु आपल्या वैयक्तिक सुख-चैनीसाठीं माणसाला एखाद्या निर्जीव वस्तूप्रमाणें किंवा मुक्या जनावरासारखें राबविण्याची जी भाषा ते रोमन सरदारपुत्र वापरत होते त्यांत कांहीं नवल नव्हतें. ते रोमन तरुण मानवी इतिहासांतील एका कलंकभूत परंपरेचे वारसदार होते.

अडीच-तीन हजार वर्षांपूर्वींच्या ईजिप्त, सुमेरियन, ग्रीस आणि रोमन संस्कृतीमधील मानवी समाजाचें गुलामांचा वर्ग हें एक काळेंकुट्ट अंग होतें. बलाढ्य आणि विजयी राष्ट्रें व वंश दुर्बल आणि पराजित राष्ट्रांना व वंशांना गुलाम बनवून राबवीत असत. दरिद्री व कर्जग्रस्त शेतकऱ्यांना सावकारी कर्ज फेडतां आलें नाहीं तर त्यांना बाजारांत गुलाम म्हणून विकलें जाई. गुलामांचा राजरोस बाजार चाले. चांगले गुलाम पुरविणें हा त्या काळचा मोठा किफायती धंदा समजला जात असे.

गुलाम बाळगणें हें ऐश्वर्याचें लक्षण समजलें जाई. आज पैशाच्या मापानें जग एखाद्याचें ऐश्वर्य जोखतें; हजार-पांचशें वर्षांखालीं बैल, गाई किंवा जमीन यांच्या संख्येवरून माणसाची संपत्ति ठरवीत. तसें अडीच हजार वर्षांपूर्वीं एखाद्याजवळ किती गुलाम आहेत यावर त्याचें वैभव अवलंबून असे. साधारण कुटुंबांत निदान दहा तरी गुलाम


असत. त्यांच्याकडून घरचें आणि दारचें सर्व काम करून घेतलें जाई. त्यांना समाजांत प्रतिष्ठा नव्हती आणि राजकीय हक्क तर नव्हतेच नव्हते.

आणि याच शापित गुलामांतील चौघे निरपराध गुलाम बाटियाटसनें कापुआच्या आखाड्यांत प्राणहारक झुंजीसाठीं उभे केले होते.

### क्रूर झुंज

नगारा गर्जूं लागला. लढत सुरू होत असल्याची ती निशाणी होती. यहूदी व थ्रेसियन जवान यांची झुंज प्रथम ठेवण्यांत आली. अंगावरचे कपडे उतरवून त्यांना उघडें करण्यांत आलें. कडक ऊन पडलें होतें. मरणाच्या वाटेवर ते दोघे दाखल झाले. रोमन पाहुण्यांसमोर त्यांना उभें करण्यांत आलें आणि पाहुण्यांना कुर्निसात करण्यास फर्माविण्यांत आलें. कारण रोमनांनीं त्यांचें रक्त व मांस खरीदलें होतें ना ?

दोघांच्या हातांत लखलखणारे सुरे देण्यांत आले. दोघेजण एकमेकांना भिडले आणि त्यांची झोंबी लागली. हळूहळू त्यांच्यांतील मनुष्यत्व पार नाहींसें झालें. शत्रुत्वानें आणि रक्ताच्या लालसेनें ते एकमेकांवर नजरा रोखत होते. गुलाम गुलामांतहि बंधुत्व असतेंच कीं. पण तेंहि त्यांना आतां सोडून गेलें होतें. कारण आतां एकमेकांवर प्रेम करून कसें चालेल ? कारण दुसऱ्याला मारलें तरच आपण जिवंत राहूं हें प्रत्येकजण जाणत होता.



ती जोडी विजोड होती. यहूदी सरस होता. त्याची अंगकाठी बारीक पण पोलादासारखी कठीण होती. थ्रेसियन जवानानें सुरीचा एक जबरदस्त वार यहुदीवर केला. पण गुडघ्यावर झटकन् खालीं वाकून यहुदीनें तो शिताफीनें चुकविला आणि थ्रेसियनच्या तंगडयांत शिरून त्यानें त्याला उंच हवेंत उडविलें व खालीं जमिनीवर पाडलें. त्याच्या छाताडावर तो स्वार झाला. आपल्या हातांतील सुरीनें यहुदीनें थ्रेसियनवर वारामागून प्राणघातक वार केले. थ्रेसियनहि कांहीं कमी नव्हता. त्यानें यहुदीला दूर फेकलें आणि तो उठून उभा राहिला.

परंतु यहुदीनें केलेल्या सुरीच्या भयंकर वारांनीं तो घायाळ झाला होता. तो एका हातानें आपला तोल सांवरत

होता आणि दुसऱ्यानें हवेमध्यें सुरा फिरवून यहुदीला आपल्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. यहूदी दूर स्तब्ध उभा होता. त्याला माहीत होतें कीं आपला प्रतिस्पर्धी आतां जगत नाहीं. कारण त्याच्या सर्वांगावर त्यानें इतके प्राणहारक वार केले होते कीं त्या थ्रेसियनचें शरीर रक्तानें न्हाऊन निघालें. आखाड्यांतील रेतींत तें घळघळा पडत होतें.

पण कुऱ्हाडीनें लांकडाचा ओंडका चिरावा तसें त्या थ्रेसियनला यहुदीनें सुऱ्यानें चिरलेलें दृश्य पहावयाची त्या रोमन तरुण पाहुण्यांची खरी इच्छा होती. म्हणून ते यहुदीला ओरडले, “ मार त्याला, काप त्याला.” तथापि यहूदी जागचा हालेना. तो आतां खचला होता. त्यानें हातांतील सुरा रेतींत फेंकून दिला. त्याचें सर्वांग थरथरूं लागलें. एक उस्ताद धांवत आला व आपल्या हातांतील चामड्याचा कोरडा यहुदीवर लगावून तो खेंकसला, “हरामखोरा, स्वस्थ काय उभा ? लढ, लढ.” एक, दोन, तीन-एकामागून एक कोरडे यहुदीच्या शरिरावर फटकारले गेले. पण तो जागचा हलला नाहीं. तिकडे तो थ्रेसियन विव्हळत होता. शेवटची एक आर्त किंकाळी त्यानें फोडली आणि तो गुलाम गुलामींतून कायमचा मुक्त झाला !

रोमन पाहुण्यांनीं क्रूर हास्य करून आनंदानें टाळ्या पिटल्या आणि यहुदीला आपणासमोर बोलाविलें. एकानें दारूचा प्याला हातांत घेतला आणि म्हटलें,

“वा रे पठ्ठा, मस्त लढत केलीस. जिंदा रहो.” आणि त्याच्या नांवानें त्यानें दारूचा प्याला ओठाला लावला.

यहूदी निश्चलपणें अवाक् होऊन त्यांच्यासमोर उभा होता.

जबरदस्त किंमत

आतां स्पार्टकस आणि दैत्यासारख्या दिसणाऱ्या त्या हबशीची झुंज होणार होती. हबशी बेचैन होता. तो गर्भगळीत झाला होता. स्पार्टकसला तो म्हणाला, "मी तुझ्याशीं लढणार नाहीं, कदापीहि लढणार नाहीं."

"आपण लढलों नाहीं तर दोघेहि प्राणाला मुकूं." मोठ्या प्रेमानें त्या हबशी गुलामाचें शिर स्पार्टकसनें कुरवाळलें आणि धीरगंभीरपणें म्हटलें, "वेड्यासारखें काय करतोस ? गुलामानें गुलामावर कधीं प्रेम करूं नये."

"छे, छे. मी लढणार नाहीं," हबशी काकुळतीनें म्हणाला, "स्पार्टकस, तूं मला मारून टाक. मी आतां जिवाला कंटाळलों आहें. शेवटीं माणूस मरण्यासाठींच जन्मतो ना ?"

"नाहीं, नाहीं; जगण्यासाठीं जन्मतो." स्पार्टकसनें उत्तर केलें.

तो हबशी आणि स्पार्टकस यांना उस्तादानें मैदानांत आणून उभें केलें.

ही जोडी तर अधिकच विजोड होती. राक्षसासारखा धिप्पाड असा तो काळा हबशी आणि लहानसा तो स्पार्टकस. हबशाच्या हातांत लांब आणि तीक्ष्ण त्रिशूळ व जाळें आणि स्पार्टकसच्या हातांत केवळ छोटासा सुरा.

हबशी गुलामाला लढावयाचें नव्हतें. जीवनाची किंचितहि ओढ त्याच्या मनांत आतां शिल्लक नव्हती. त्यानें मनानें मृत्यूला कधींच वरलें होतें. एकदां नव्हे तर बावन्नदां त्यानें त्रिशूळ आणि जाळें हातांत घेऊन अनेक प्रतिस्पर्धी गुलामांना लढतीमध्यें जमिनीवर लोळविलें होतें. पण, आतां त्याला मरावयाचें होतें. स्पार्टकसला मारून जगावयास तो तयार नव्हता.

हबशीनें स्पार्टकसच्या अंगाला स्पर्शसुद्धां केला नाहीं. त्यानें आपल्या हातांतील जाळें जमिनीवर फेंकून दिलें. आणि तोंडांतून विचित्र आवाज व हिंस्त्र जनावरासारखे चीत्कार काढीत तो दैत्यकाय हबशी रोमन पाहुण्यांच्या दिशेनें चालूं लागला. उस्तादानें त्याला नंग्या तलवारीनें हटकलें. पण हबशीनें आपल्या हातांतील तीक्ष्ण त्रिशूळ त्याच्या छातींत खुपसला आणि त्याला हवेंत फेकून दिलें. आणखी एक सहा फूट उंच धिप्पाड शिपायानें त्याला आडवावयाचा प्रयत्न केला. पण त्यालाहि हबशीनें लंबे केलें आणि पाहुण्यांच्या दिशेनें तो धांवूं लागला.

आतां शिपायांची एक तुकडीच्या तुकडी धांवत आली. आणि तिच्यांतील एकानें एक भला मोठा तीक्ष्ण भाला हबशीच्या पाठींत खुपसला. पण तेवढ्यानेंहि तो पोलादी पुरुष जमिनीवर कोसळला नाहीं. त्याच्या पाठींतून छातींत शिरून भाल्याचें टोंक बाहेर आलें होतें; तरीहि तो हबशी पुढें जातच होता. दुसरा एक भाला फेंकला गेला आणि त्यानें त्याला एका बगलेंत चिरलें. हबशी खालीं कोसळला. पण दोन्ही हातांचे पंजे जमिनीवर टेकून तो अजूनहि पुढें

जातच होता. आणखी एक तिसरा भाला, आणि तो शेवटचा चौथा भाला. तो त्याच्या रुंद मानेंत घुसला आणि अखेर हबशी भुईसपाट पडला. परंतु मरतां मरतांसुद्धां त्याचे रुंद पंजे त्या रोमन तमाशबीन तरुणांना पकडण्यासाठीं जमिनीवर चांचपडत होते.

## उदयोन्मुख स्पार्टकस

•

स्पार्टकस दिङ्मूढ होऊन उभा होता. काय झालें हें त्याला समजेना; काय करावें हें त्याला उमगेना. स्वतः मृत्यूला कवटाळून हबशीनें आपल्याला जिवंत ठेविलें याबद्दल त्याला मनस्वी दुःख झालें आणि कृतज्ञताहि वाटली. आपल्या हातांतील सुरा त्यानें फेकून दिला.

झालेला प्रकार अनपेक्षित आणि अघटित होता. बाटियाटसच्या अंगाची संतापानें लाही लाही झाली. इतर गुलामांना दहशत बसावी म्हणून त्यानें आपल्या शिपायांकरवीं एका काळ्या नीग्रो गुलामाला लांकडाच्या दंडयानें चेंचून ठार मारलें.

परंतु बाटियाटसचा डाव हुकला होता. कारण स्पार्टकस जिवंत राहिला. स्पार्टकस जिवंत राहण्यांत रोमन सत्तोन्मत्तांना आव्हान होतें आणि गुलामी प्रथेचा अंत होण्याची आशा होती.

कारण स्पार्टकस गुलाम होता तरी तो असाधारण गुलाम होता; गुलामांतील माणूस होता. जुलमी व पिळवणूक करणाऱ्या सत्तेविरुद्ध झगडून गुलामांना माणसांची प्रतिष्ठा

प्राप्त करून देण्यासाठीं मानवी इतिहासाच्या प्रारंभापासून चाललेल्या निरंतर मुक्तिसंग्रामाच्या मालिकेंतील तो उदयोन्मुख.तेजस्वी तारा होता.

स्पार्टकस कोण व कोठला याबद्दल इतिहासांत दोन मतें आहेत. कोणी इतिहासकार म्हणतात कीं उत्तर ग्रीस-मधील थ्रेसिली देशांतील एका गुलाम राजवंशांत त्याचा जन्म झाला. रोमन सैन्याच्या थ्रेसियन तुकडींत तो सैनिक म्हणून पुढें दाखल झाला. नंतर त्यानें ती नोकरी सोडली आणि तो पळाला. रोमनांनीं त्याला पकडलें आणि शिक्षा ठोठावून कापुआच्या आखाड्यांत पाठवून दिलें. दुसरे कोणी इतिहासज्ञ म्हणतात कीं, नुबिया येथील सोन्याच्या खाणींत काम करणारा स्पार्टकस हा एक गुलाम मजूर होता व बाटियाटसनें आपल्या आखाड्यांत झोंबी खेळण्यासाठीं त्याला विकत घेतलें आणि तेव्हांपासून तो कापुआंत आला.

कापुआच्या आखाड्यांत आल्यापासून स्पार्टकस अस्वस्थ होता. जीवनावर त्याचें अपार प्रेम होतें. परंतु निरर्थक जीवन जगण्याची किंवा रोमनांच्या सुखासाठीं एखाद्या झोंबींत मरण्याची त्याची इच्छा नव्हती. मृत्यूचें त्याला लवमात्र भय नव्हतें. गुलामांच्या मुक्तीसाठीं आपलें जीवन समाप्त करण्यासाठीं तो मनानें सिद्ध होता. तो तशा संधीची वाट पहात होता.

आणि अशी संधि आपणच निर्माण करावी लागेल ही कोणाहि खऱ्या नेत्याला असलेली जाणीव त्याच्याहि मना-मध्यें होती. कापुआच्या आखाड्यांत आल्यापासून त्यानें इतर गुलामांशीं दोस्ती जमविली. स्वतःला विसरून

त्यांच्यावर तो माया करीत असे. आखाड्यांत अनेक देशांतील गुलाम होते—थ्रेसियन होते, गॉल होते, जर्मन होते, यहूदी होते, आफ्रिकन होते. या भिन्न देशांतील आणि भिन्न वंशांतील गुलामांचा त्यानें विश्वास संपादन केला व त्यांचा तो लाडका नेता बनला.

कापुआच्या आखाड्यांतील दोनशें गुलामांचा समुदाय हें एक धुमसतें अग्निकुंड होतें. असंतोष व संताप यांनीं प्रत्येक गुलामाचें हृदय जळत होतें. त्या गुलामांत अनेक माजी बंडखोर गुलाम आणि त्यांचे नेते होते. त्यांपैकीं क्रिक्सस हा एक गॉल गुलाम होता. सिसिलीमधील एका जहागीरदाराच्या जहागिरींत नुकत्याच झालेल्या गुलाम-विद्रोहांत त्याला पकडून कापुआस आणण्यांत आलें होतें. हाच क्रिक्सस पुढें स्पार्टकसच्या बंडांत त्याचा उजवा हात बनला.

### भडका उडाला

•

रोमन तरुणांसाठीं लावलेल्या त्या चार गुलामांच्या झोंबीच्या निमित्तानें ज्या घटना घडल्या त्यांनीं आखाड्यां-तील सर्व गुलामांच्या मनांतील सुप्त संतापाग्नीवर जणुं ठिणगी पडली होती. स्पार्टकसचा काटा काढण्याच्या हेतूनें त्याला या झोंबींत एका सुशस्त्र-सज्ज हबशीबरोबर लढावयास लावण्यांत आलें ही पहिली ठिणगी होती. नंतर स्पार्टकसला आलिंगन देण्याबद्दल एका गुलामाला तीस फटक्यांची शिक्षा देण्यांत आल्यावर दुसरी ठिणगी पडली. त्या हबशीनें स्पार्टकसशीं लढण्याचें नाकारलें तेव्हां त्याला

भाल्यानें जिवें मारलें तेव्हां गुलामांच्या मनांतील संताप अनावर झाला. आणि शेवटीं झाल्या प्रकाराचा सूड घेण्यासाठीं एका निग्रो गुलामाला ठार मारण्यांत आलें तेव्हां तर गुलामांची सहनशीलता संपली आणि त्यांच्यांतील सूडाची भावना अधिकच प्रज्वलित झाली.

या प्रज्वलित अग्नीला भडका देण्यासाठीं आतां नेतृत्वाचीच काय ती गरज होती. स्पार्टकसनें ती पुरविली.

एके दिवशीं शिपायांची व उस्तादांची नजर चुकवून आखाड्यांतील सर्व गुलाम एकत्र जमा झाले. स्पार्टकस धीरगंभीर वाणीनें त्यांना म्हणाला,

"आतां आपण किती दिवस हा जुलूम सहन करावयाचा ? बोला, तुम्ही माझ्याबरोबर यावयाला तयार आहांत काय ?"

"पण पिताजी, आपण काय करावयाचें ?" गुलामांनीं उत्सुकतेनें प्रश्न केला.

"या पिंजऱ्यांतून बाहेर पडूं आणि लढूं. खूप मर्दुमकीनें लढूं आणि रोमनांना असा हात दाखवूं कीं जन्माची त्यांना आठवण राहील." स्पार्टकसनें घोषणा केली. त्याची ती तेजस्वी व दुर्दान्त घोषणा ऐकून साऱ्या गुलामांचें शरीर रोमांचित झालें. त्यांचा आत्मविश्वास आणि स्वाभिमान जागा झाला. शेकडों वर्षांच्या गुलामीचा बोजा उचलून फेंकून देण्यासाठीं सज्ज झालेला नेता त्यांना स्पार्टकसमध्यें मिळाला. त्यांच्या डोळ्यांत आनंदाचे आणि प्रेमादराचे अश्रू चमकूं लागले. ते ओरडले, "स्पार्टकस जिंदाबाद !"

"स्पार्टकस जिंदाबाद !"

या घोषणेनें स्पार्टकसला आपल्या शिरावर केवढा मोठा जबाबदारीचा डोंगर ठेविला गेला आहे याची जाणीव झाली. आपण ही जबाबदारी पार पाडण्यासाठीं एकाकी कसे लढणार या विचारानें तो चिंताग्रस्त झाला. पण स्पार्टकसच्या आधीं सतत सव्वाशें वर्षें स्पेनपासून सिसिली-पर्यंत चाललेल्या गुलामांच्या मुक्तिसंग्रामाच्या इति-हासाच्या स्मृतीनें त्याला आत्मविश्वास दिला. त्याच्या दृष्टीसमोरून गुलामांच्या त्या अनेक लहानमोठ्या आणि पराजित उठावांचा चित्रपट सरकूं लागला.

स्पार्टकसच्या आधीं सुमारें सव्वाशें वर्षांपासून रोमन साम्राज्य-सत्तेविरुद्ध अनेक गुलाम-बंडें झालीं होतीं. पहिला उठाव कार्थेजियन गुलामांनीं केला. आणि त्यानंतर ग्रीस-मधील लॉरियाम खाणींतील मजूर-गुलाम, स्पेनमधील खाण-गुलाम, सिसिली, जर्मनी, सीरिया येथील पीडित गुलाम यांनीं ही परंपरा अखंडपणें चालू ठेविली. आणि उन्मत्त सत्ताधारी रोमनांना दाखवून दिलें कीं, मानव मान-वाच्या गुलामींत रहावयास कदापीहि तयार होणार नाहीं. सिसिलीयन गुलाम यूनूस, ग्रीसचा एथियन, थ्रेसिलीचा सेल्वियस, जर्मनीचा डंडार्ट आणि यहूदी गुलाम बेन जोश हे या बंडाचे महान् नेते होते.

स्पार्टकसला या पराक्रमी निधड्या छातीच्या नेत्यांचें स्मरण झालें आणि त्यांचें सामर्थ्य आपल्या पाठीशीं उभें आहे या कल्पनेनें त्याचें मन आत्मविश्वासानें व आशेनें फुलून गेलें.

आणि अखेर स्पार्टकस वाट पहात होता तो क्षण आला. एक दिवस सकाळीं आखाड्यांतील गुलामांना

कवायतीसाठीं मैदानाकडे नेण्यांत येत होतें. उस्तादांच्या रखवालींत ते चालले होते. मध्येंच एके ठिकाणीं रखवालदार दूर आहे असें पाहून स्पार्टकस वाटेंत थांबला. त्याला गुलामांशीं बोलावयाचें होतें. गुलाम त्याच्याभोंवतीं जमा झाले. दोन दिवसांपूर्वीं स्पार्टकसनें केलेल्या स्फूर्तिदायक घोषणेनें त्यांच्या मनाचा ताबा घेतला होता. "या पिंजऱ्याबाहेर पडूं आणि लढूं—" असें स्पार्टकस म्हणाला होता. आतां तो पुढील योजना सांगेल या उत्सुकतेनें पहारेकऱ्यांची नजर चुकवून गुलाम त्याच्याभोंवतीं उभे होते.


इतक्यांत दूर अंतरावर असलेले रखवालदार धांवत तेथें आले आणि कडाडले,

"काय चालली आहे गडबड ? चलो, हट जाव !" गुलामांनीं रखवालदारांकडे दुर्लक्ष केलें.

"ऐकत नाहीं ? चालते व्हा," उस्ताद पुन्हां ओरडले. आणि गुलामांभोंवतीं गराडा घालून त्यांनीं त्यांच्यावर निर्दयपणें कोरडयांचे वार हाणावयास सुरुवात केली. तरीहि गुलाम जागचे हालेनात. त्यांच्यापैकीं एक आफ्रिकी हबशी उस्तादांच्या अंगावर धांवून गेला आणि ओरडला,

"तुम्हीं लोक आम्हांला काय कुत्रे समजतां ? आवरा हात आणि चालते व्हा."

हा प्रतिकार उस्तादांना अनपेक्षित व अपरिचित असा वाटला. आपल्या सत्तेला गुलामांनीं आव्हान दिलेलें त्यांनीं यापूर्वीं अनुभविलें नव्हतें त्यांनीं आपले सुरे बाहेर काढले आणि गुलामांवर हल्ला चढविला.



स्पार्टकस गरजला,

"मित्रांनो, आतां माघार घेतां येणार नाहीं."

सर्व गुलाम सज्ज झाले आणि त्या मूठभर उस्तादांवर तुटून पडले. अल्पावधींत त्यांनीं त्यांना जमिनीवर लोळविलें.

जशी उस्तादांना तशी गुलामांना ही सर्वच घटना अकल्पित होती. पण नेता स्पार्टकसला माहीत होतें कीं, बंडाचा प्रारंभ असाच होत असतो. त्यानें गुलामांना आदेश दिला,

"चला आतां रोमन सैनिकांचा समाचार घेऊं. एक तर ते मरतील नाहीं तर आपण तरी देह ठेवूं."

चतुर नेत्यानें गुलामांची मन:स्थिति बरोबर ताडली होती. गुलाम ओरडले,

"आम्ही तयार आहोंत. स्पार्टकस जिंदाबाद !"

पण गुलाम निःशस्त्र होते. ढाली, तरवारी आणि भाले यांनीं सुसज्ज असलेल्या आखाड्याच्या रखवालीसाठीं ठेवलेल्या चाळीस रोमन सैनिकांशीं आणि दोन डझन उस्तादांशीं त्यांना सामना करावयाचा होता.

आखाड्याचें एक मोठें स्वयंपाकघर होतें. त्यांत गुलाम घुसले आणि सुऱ्या, झारे, मुसळें, मोठ्या भांड्यांचीं झांकणें, पराती, लांकडी दांडके वगैरे जी जी वस्तु हातीं लागेल ती त्यांनीं ताब्यांत घेतली. त्याच त्यांच्या तरवारी आणि ढाली आणि भाले झाले !

सर्व गुलाम सज्ज झाले. स्वयंपाकघरांत काम करणाऱ्या गुलाम स्त्रियाहि त्या फौजेंत सामील झाल्या. स्पार्टकस सेनापति झाला.

झालेल्या घटनेची वर्दी आखाड्याच्या मुख्य शिपायी ठाण्यावर पोंचली तेव्हां एकच कोलाहल माजला. रोमन सैनिक आणि उस्ताद या अनपेक्षित घटनेनें गोंधळून गेले. रोमनांचें रक्त संतापानें उसळलें. त्यांच्या नाईकानें सर्व सैनिकांना व उस्तादांना आखाड्याकडे जाण्याचा हुकूम दिला.

चाळीस सैनिक व चोवीस उस्तादांचे जथ्थे मैदानांत येऊन दाखल झाले. गुलामांवर चढाई करण्यासाठीं ते पांगण्यापूर्वींच दोनशें गुलामांच्या फौजेनें त्यांना घेरा घातला आणि कोंडींत पकडलें. सैनिकांपासून सुमारें सव्वाशें फुटांवर घेरा घालून ते उभे होते. तेथून आधींच गोळा

करून ठेवलेल्या अणकुचीदार व भल्या मोठ्या दगडांच्या ढिगाऱ्यांतून दगड उचलून त्यांनीं त्यांचा रोमनांवर अक्षरशः वर्षाव सुरू केला. दगडांचा एवढा पाऊस पाडला कीं रोमन सैनिक व उस्ताद गुलामांपर्यंत पोंचून त्यांच्यावर हल्ला करू शकेनासे झाले.

साऱ्या दुनियेला थरथरा कापावयास लावणाऱ्या रोमन फौजेंतील ते सैनिक भांबावून गेले. परंतु कांहीं झालें तरी ते सरावलेले योद्धे होते. दगडांचा वर्षाव होत असतांनाहि अचूक नेमानें त्यांनीं आपल्या भाल्यांनीं कित्येक गुलामांना ठार मारलें. पण आतां भालेहि संपले व तलवारी काम देईनात.

बंडखोर गुलामांची संख्या अधिकच वाढत होती. कापुआच्या आखाड्याजवळपासच्या घराघरांतील, रानारानांतील गुलाम धांवत आले आणि बंडखोरांत सामील झाले.

आतां दगडांचा वर्षाव थांबला होता; कारण दगडच संपले होते. त्यामुळें रोमनांची व गुलामांची आमनेसामने गांठ पडली. आपल्याजवळच्या सुऱ्या, झारे, मुसळें, दांडके आदि शस्त्रांसह गुलाम रोमनांवर तुटून पडले. रोमनांच्या तलवारीला आणखी कित्येक गुलाम बळी पडले. पण गुलामांची संख्या अधिक होती.

कित्येक तास ही लढाई चालली होती. शेवटीं बलाढ्य रोमनांचा निःशस्त्र गुलामांनीं पुरा धुव्वा उडविला.

## गुलाम स्वतंत्र झाले

●

गुलाम स्वतंत्र झाले. स्वातंत्र्याचा पहिला श्वास त्यांनीं घेतला. अनिर्वचनीय आनंदानें ते बेहोष झाले. एकमेकांना त्यांनीं कडकडून आलिंगनें दिलीं. कधीं ते एकमेकांशीं मोकळेपणानें बोलूं शकत नव्हते. परंतु आतां एकमेकांना न समजणाऱ्या आपापल्य भाषेंत त्यांनीं मनमोकळ्या गप्पा मारल्या.

–इसवी सनापूर्वी ३० व्या वर्षीं ही घटना घडली.

या लढाईंत बचावलेले सुमारें सत्तर गुलाम बंडखोर स्पार्टकसच्या नेतृत्वाखालीं कापुआच्या आखाड्यांतून पळाले. ते स्वतंत्र झाले. परंतु हें स्वतंत्र्य टिकविणें किती कठीण होतें याची त्यांना चांगली जांणीव होती. स्वरक्षणासाठीं शांत वेसुवियस पर्वताच्या आश्रयास ते गेले.

कापुआच्या आखाड्यांतील उठाव हें गुलामांनीं समर्थ रोमन सत्तेला दिलेलें उघड आव्हान होतें. मूठ भर रानटी आणि भुक्कड गुलामांनीं चौदिशांना पसरलेल्या आपल्या साम्राज्याला आव्हान द्यावें हें रोममधील सेनेटला सहन होणें कसें शक्य होतें ? रोमची अनंत व असीम सत्ता न मानणाऱ्या मोठमोठ्या बलाढ्य शत्रूंना आपण जेथें पाणी पाजलें तेथें या गुलाम घुंगरट्यांची मिजास आपण चालूं देणार नाहीं असें मदोन्मत्त रोमन सत्ताधाऱ्यांनीं ठरविलें. सुसंकृत रोमन समाज आणि एकंदर सभ्य मानवी जीवनायाला मूठभर असंस्कृत आणि दांडग्या दरोडेखोरांनीं दिलेलें कापुआचें बंड हें आव्हान आहे असें रोमनांचें मत होतें.

म्हणून तीन हजार शस्त्रसज्ज रोमन सैनिकांची सेना स्पार्टकसच्या पारिपत्यासाठीं रोमहून निघाली. पण आतां रोमनांना गुलामांच्या मोठ्या सेनेला तोंड द्यावयाचें होतें.

कारण कापुआच्या यशस्वी उठावानंतर स्पार्टकसच्या बंडखोर गुलाम सेनेंत दक्षिण इटलींतील शेकडों गुलाम दाखल झाले होते. एक हजारापर्यंतआतां गुलाम सैनिकांची संख्या वाढली होती. सर्व देशांतील गुलाम वंशभेद आणि राष्ट्रभेद विसरून स्पार्टकसच्या मुक्तिसेनेंत एकदिलानें काम करीत होते. गुलामांना कुठलें स्वतःचें राष्ट्र आणि कुठला वंश ! त्यांची एकच जात आणि ती म्हणजे गुलामांची. त्यांचें एकच जग आणि तें म्हणजे गुलामांचें. त्यांचें एकच ध्येय आणि तें म्हणजे माणसाप्रमाणें या माणसांच्या जगांत रहावयाचें. या उदात्त एकतेच्या भावनेनें त्या गुलामांत प्रचंड सामर्थ्य निर्माण झालें होतें.

आणि स्पार्टकस त्यांचा नेता होता. इतिहासकारांनीं सुद्धां त्याला असामान्य शूर व कुशल सेनानी आणि धीरोदात्त व चतुर लोकनेता म्हणून गौरविलें आहे. त्याच्या अनुयायांची त्याच्यावर अनन्यसाधारण श्रद्धा व भक्ति होती. कारण त्याच्या जीवनांत त्यांची मुक्ति होती. आणि त्यांच्या मुक्तींत आपलें जीवन आहे असें मानणारा तो नेता होता.

कापुआच्या पहिल्या लढाईंत जखमी झालेला एक गुलाम एक दिवस सर्वजण एकत्र जमले असतां आपल्या लडखडणाऱ्या पायांवर उभा राहून म्हणाला,

"मला आतां मृत्यूचें भय वाटत नाहीं. मी एक मोठें कार्य केलें आहे. माझें मन तृप्त आहे. मी आतां शांत मनानें चिरनिद्रा घेईन. परंतु मरावयाच्या आधीं मी स्पार्टकसला विचारतों—'तूं रोमनांविरुद्ध उचललेलें हत्यार कधीं म्यान तर नाहीं करणार ?"

"नाहीं, कदापीहि नाहीं," स्पार्टकसनें ताडकन् उत्तर दिलें. आणि त्या गुलामानें स्पार्टकसला कडकडून मिठी मारली.

रोमहून आलेल्या सैन्यानें स्पार्टकसची सेना जेथें आश्रयास राहिली होती त्या वेसुवियस पर्वतास चोहोंबाजूंनीं वेढा घातला आणि गुलामांची नाकेबंदी केली. हेतु हा कीं त्यांची रसद तोडली जावी. परंतु गुलामांचा दम उखडला तर नाहींच. उलट संधि साधून वेसुवियसच्या अवघड डोंगरकपारी उतरून ते खालीं आले व रोमनांवर बेधडक हल्ले करण्यास त्यांनीं सुरुवात केली. बिकट डोंगरांत आणि रानांत लढाई चालू होती. गुलामांनीं रोमनांना शक्य तेवढें पर्वतराजींच्या अंतर्भागांत घेतलें व नंतर चोहोंबाजूंनीं वेढा घालून त्यांना पर्वतांत कोंडलें आणि त्यांची दाणादाण उडविली. प्रत्येक रोमन सैनिक त्यांनीं कापून काढला व त्यांचीं शस्त्रास्त्रें लुटलीं.

वेसुवियसमधील गुलामांचा हा दुसरा विजय असामान्य होता. तीन हजारांची रोमन सेना त्यांनीं यमसदनास पाठविली होती.

उन्मत्त रोमन सत्ताधाऱ्यांना या विजयानंतर सेनापति स्पार्टकसनें एक संदेश पाठविला. त्यांत त्यानें म्हटलें होतें :

"तुमच्यामुळें जग तंगीस आलें आहे. मालक आणि गुलाम अशी या सुंदर दुनियेची तुम्हीं अभद्र वांटणी केली आहे. मानवी जीवनाची तुम्हीं विटंबना चालविली आहे. पण लक्षांत ठेवा, आतां ही गोष्ट आम्ही चालूं देणार नाहीं. तुमची वाटेल तेवढी मोठी सेना तुम्ही पाठवा. आम्ही तिचा समाचार घेण्यास समर्थ आहोंत. आम्ही संख्येनें आणि सामर्थ्यानें तुमच्यापेक्षां श्रेष्ठ आहोंत हें विसरलात काय? एक दिवस आम्ही तुमच्या त्या इंद्रपुरीवर—रोमवर चाल करून येऊं, तिच्या भिंती फोडूं, तुम्हांला तुमच्या सिंहासनावरून खालीं खेंचूं आणि रोम पुन्हां नव्यानें बांधूं. आमचें रोम अधिक शांत, अधिक सुंदर असेल. आमच्या नगरींत पिळवणूक असणार नाहीं. माणसा-माणसांत भेदाच्या भिंती असणार नाहींत."

रोमहून आणखी सैन्य आलें. परंतु गुलाम-फौजेनें तिचाहि निःपात केला. या लागोपाठ प्राप्त झालेल्या दैदीप्यमान विजयांनीं गुलामांना भरपूर शस्त्रें मिळालीं आणि त्यांचा आत्मविश्वास दुणावला. आतां त्यांनीं पन्नास हजारांची शस्त्रसज्ज आणि शिस्तबद्ध प्रचंड सेना उभारली. या सेनेनें सर्व दक्षिण व पूर्व इटलीवर लौकरच ताबा मिळविला. तसेंच सूडानें ग्रासलेल्या गुलामांनीं अत्याचारहि केले.

गुलामांचें बंड रोज पसरत होतें; स्पार्टकसचें बळ वाढत होतें. रोमनांनीं आतां साठ हजारांचें प्रचंड शस्त्रसज्ज सैन्यदळ गुलामांच्या निर्दालनासाठीं पाठविलें. रोम

जबरदस्त हादरलें होतें. हॅनिबॉलनें सुमारें दोनशें वर्षांपूर्वी केलेल्या रोमन साम्राज्यावरील भयंकर आक्रमणाइतकेंच स्पार्टकसचें आक्रमण जबरदस्त होतें.

### युद्ध आणि अखेर

•

साठ हजारांच्या विशाल सेनेशीं स्पार्टकसच्या सैन्याला तोंड द्यावयाचें होतें. . स्पार्टकसचा सहकारी सेनानी गॉल गुलाम क्रिक्सस याच्या फौजांना गुलामांच्या मुख्य सेनेपासून एका बाजूस गांठून रोमनांनीं तिचा पराभव केला. परंतु उरलेल्या सैन्यानें स्पार्टकसच्या सेनापतित्वाखालीं शर्थीनें झुंज दिली आणि रोमन सैन्याचा त्याच्या पांच बडया बडया सेनानींसह पराभव केला.

परंतु विजयामागून मिळणाऱ्या या विजयांतच गुलामांच्या भावी पराजयाचीं बीजें पेरलीं गेलीं. प्रथम निरनिराळ्या वंशांतील गुलाम स्पार्टकसच्या नेतृत्वाखालीं एकजुटीनें लढले खरे. परंतु जसे विजय मिळूं लागले तशीं त्यांच्यांत भांडणें व स्पर्धा सुरू झाली. रोमनांविरुद्धच्या युद्धाची प्रारंभिक अवस्था आतां संपली होती. युद्धाची निश्चित योजना आणि शिस्त यांची आतां गरज होती. पण त्या बाबतींत गुलाम-सेना कमकुवत ठरूं लागली. त्यामुळें आजवर झालेल्या प्रारंभिक विजयाचा अंतिम यशासाठीं ते फायदा करून घेऊं शकले नाहींत.

रोमचा दक्षिण भाग निःशेष जिंकून झाला होता. आतां माघार घेऊन सर्व वंशांच्या गुलाम-सैनिकांनीं आपापल्या

मायभूमीस परत जावें आणि स्वतंत्र नागरिकाप्रमाणें रहावें अशी स्पार्टकसची योजना होती. रोमवर अखेरची चाल करून जाण्यापूर्वी तयारीसाठीं त्याला वेळ हवा होता. जिंकलेल्या मुलखाच्या रक्षणासाठीं थोडें सैन्य ठेऊन बाकीचें बरखास्त करण्याची सूचना म्हणूनच त्यानें मांडली.

परंतु त्याचे अनुयायी त्या गोष्टीस तयार होईनात. रोमनांवर हल्ले करून त्यांची धनदौलत लुटण्याची त्यांना जबरदस्त चटक लागली होती. स्वातंत्र्याचें आपलें उद्दिष्ट ते विसरूं लागले होते. केवळ लूटमार करून जगावें अशी त्यांची इच्छा होती.

आपल्या अनुयायांच्या विरोधापुढें स्पार्टकसचें कांहीं चाललें नाहीं. ते आपापसांत भांडत होते. सेल्ट व जर्मन गुलाम सेना आपापल्या वंशांच्या सेनापतींच्या नेतृत्वाखालीं स्वतंत्रपणें रोमनांशीं लढूं लागल्या. आपल्या अनुयायांतील फाटाफूट टाळून गुलामफौजेला संपूर्ण विनाशापासून बचावण्यासाठीं स्पार्टकसनें रोमवर अखेरचा वार करण्याची घोषणा केली. परंतु क्रिक्ससासकट त्याच्या सर्व महत्त्वाच्या सहकाऱ्यांनीं या घोषणेस विरोध केला.

स्पार्टकसचें रोमच्या भिंती फोडून तेथें रोमची नवनगरी निर्माण करण्याचें भव्य स्वप्न साकार होऊं शकलें नाहीं. सतत चार वर्षें तो रोमशीं झुंज देत होता; शर्थीची टक्कर देत होता. पुढें एका लढाईंत त्याचा सहकारी गॉलसेनानी क्रिक्सस रणांगणावर आपल्या बारा हजार सैनिकांनिशीं कामीं आला. त्याच्या मृत्यूनें स्पार्टकस अत्यंत दुःखाकुल


झाला. रणांगणावर लहान मुलासारखा तो अक्षरशः रडला. आतां स्पार्टकस एकटा पडला.

तथापि तो खचला नाहीं. दुभंगलेल्या गुलाम-सैन्याची त्यानें पुन्हां जमवाजमव केली आणि तो रोमनांविरुद्ध पुन्हां उभा राहिला.

रोमनांवर अखेरचा वार करण्यासाठीं तो आपल्या सैन्यासह निघाला. सर्व गुलाम स्पार्टकसभोंवतीं पुन्हां एकनिष्ठेनें जमा झाले. गुलाम आपापसांत भांडत. परंतु स्पार्टकसबद्दल त्या सर्वांच्या मनांत नितान्त आदर आणि प्रेम होतें. कारण क्षुद्र वंशाभिमान किंवा वंशभेद यांच्या पलीकडे तो होता. एक उदात्त, सरळ आणि प्रामाणिक नेता म्हणून गुलाम त्याला मानीत.

एक दिवस स्पार्टकसचें सैन्य चालूं लागलें. गुलामांनीं त्याला एक शुभ्र, सुंदर घोडा बसण्यासाठीं आणून दिला. स्पार्टकसनें त्याच्यावर बसण्याचें साफ नाकारलें; आणि तो म्हणाला, "मी तुमच्यांतलाच एक साधा शिपायी आहें. तुमच्याबरोबरच मी चालणार आणि लढणार. एकत्र सर्वजण विजयी होऊं नाहींतर विजयासाठीं एकत्र मरूं." असें म्हणून त्यानें एका लांब तलवारीनें स्वतःच्या हातानें त्या सुंदर घोड्याला ठार मारलें आणि इतर सामान्य गुलामांबरोबर तो वाट चालूं लागला.

शत्रूचें दल समोरून येत होतें. दोन्ही सैन्य-दळें एकमेकांना भिडलीं. कित्येक दिवस लढाई चालली होती. स्पार्टकसचे



अनेक साथीदार ठार झाले. पण तो खचला नाहीं. त्यानें स्वतः कमाल केली. आपल्या सैन्याला धीर देऊन तो लढत होता. त्याच्या शरिरावर अनेक प्राणघातक जखमा झाल्या होत्या. शरीर रक्त सांडत होतें.

अखेरचा क्षण जवळ येत होता. परंतु स्पार्टकसला त्याचें काय भय ? त्याचें जीवन कृतार्थ झालें होतें. गुलामांच्या मुक्तीसाठीं तो जगला, झिजला आणि आतां मरणारहि होता. स्पेनपासून इटलीपर्यंतच्या विविध देशांतील भिन्न भिन्नवंशीय गुलामांना एका निशाणाखालीं आणण्याची अपूर्व कामगिरी त्यानें केली होती. रोमन सत्ताधाऱ्यांविरुद्ध इटलींत पन्नास हजारांपेक्षां जास्त गुलामांची प्रचंड फौज

उभारून त्यानें पहिला सुसंघटित उठाव केला होता. सतत चार वर्षें रोमनांना त्यानें दे माय धरणी ठाय केलें होतें. त्याच्या बंडाची एवढी दहशत बसली होती कीं पुढें दोनशें वर्षें उन्मत्त सत्ताधाऱ्यांना त्याची भयंकर आठवण राहिली.

* * *

9233 दि. २०।५।८
बा. वा.

BVBK-0401233

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई वी चीज उठाव : बुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७ भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.